Cir-Marathi-110

# *मुंबई विद्यापीठ*

क्र.इएसटी/आयसीडी/२०१४–१५/७७६

परिपत्रक :–

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचा–यांकरिता **"वैद्यकीय गट विमा योजना"** (Group Health Insurance) दि. १८ जुलै, २०१४ पासुन कार्यान्वीत करण्यात आली आहे. **वैद्यकीय गट विमा योजनेबाबत** सविस्तर चर्चा करण्याकरीता विद्यानगरी परीसर येथे दिनांक ३१ जुलै, २०१४ रोजी दुपारी २.०० वाजता तसेच फोर्ट परीसर येथे दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी दुपारी ४.०० वाजता कार्यशाळा आयोजित करण्याचे योजिले आहे. सदर कार्यशाळेचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे :–

मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, कलिना

स्थळ –

**कविवर्य कुसुमाग्रज मराठी भाषा भवन सभागृह,**

**मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, कलिना, मंबई – ४०००९८**

| दिनांक | वेळ | कार्यशाळेचा विषय |
|---|---|---|
| ३१ जुलै, २०१४ | दुपारी २.०० वाजता | "वैद्यकीय गट विमा योजना" |

मुंबई विद्यापीठ, फोर्ट

स्थळ –

**मुबंई विद्यापीठ मुख्य इमारत,**

**खोली क्र. १४४, पहिला मजला**

| दिनांक | वेळ | कार्यशाळेचा विषय |
|---|---|---|
| १ ऑगस्ट, २०१४ | दुपारी ४.०० वाजता | "वैद्यकीय गट विमा योजना" |

उपरोक्त तपशीलानुसार विद्यानगरी परीसरातील कर्मचा–यांना **३१ जुलै, २०१४ रोजी** दुपारी **२.०० वाजता** तसेच फोर्ट परिसरातील कर्मचा–यांना **१ ऑगस्ट, २०१४ रोजी** रोजी दुपारी **४.०० वाजता** कार्यशाळेस उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली असून, उपकुलसचिव/सहायक कुलसचिव/विभागप्रमुखांनी एखादी त्वरित बाब असल्यास ती बाकी राहू नये, याची काळजी घेऊन फोर्ट व कलिना परिसरामधील कर्मचा–यांना उपस्थित राहण्याकरिता परवानगी दयावी.

*कुलसचिवांकरिता*

मुंबई–४०००३२.

२८ जुलै, २०१४

प्रति,

विद्यापीठातील विभागाचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल,
परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.